*UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# || संशोधक ||

**पुरवणी अंक ८ – मार्च २०२४ (त्रैमासिक)**

- शके १९४५
- वर्ष : ९२
- पुरवणी अंक : ८

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे
- डॉ. एस. व्ही. पणदे
- डॉ. एम. बी. मगदूम

• प्रकाशक •

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०
Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

४८. महाराष्ट्रातील आदिवासी समाजातील धार्मिक परंपरा : एक अभ्यास

- प्रा. डॉ. दत्तात्रय रामचंद्र डुबल ---------- २१२

४९. वंचितांचे उद्धारक महात्मा फुले

- प्रा. डॉ. काशिलींग रघुनाथ गावडे ---------- २१७

५०. आदिलशाही काळातील श्री. सिध्दनाथ देवस्थान आलेगाव

- डॉ. रावसाहेब तुळशीराम गडहिरे ---------- २२२

५१. स्वातंत्र्यपूर्व काळातील महाराष्ट्रातील स्त्रीविषयक दृष्टीकोन

- १) डॉ. शितल चंद्रकांत पाटील २) डॉ. सचिन श्रीरंग चव्हाण ---------- २२६

५२. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या दलित चळवळीमधील आणि दलित पँथर चळवळीतील स्त्रियांचा सहभाग

- प्रा. कल्पना सुनील गुरव ---------- २३०

५३. मोहोळ तालुक्याला लाभलेला ऐतिहासिक वारसा

- १) भगत रेशमा मारुती २) डॉ. गायकवाड एस.एस. ---------- २३३

५४. शाहीर विश्वासराव फाटे आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ

- महेश जगन्नाथ साखरे ---------- २३७

५५. कळसूबाई एक आदिवासी लोकदेवता व बाह्य संस्कृतीचे संक्रमण

- श्रध्दा सुधीर वाघमारे ---------- २४१

५६. श्री गेनसिद्ध मंदिर, सोलापूर

- १) गोपाळ आडीअप्पा यरगल २) प्रा.डॉ. चंद्रकांत सी.चव्हाण ---------- २४५

५७. स्त्रीवादी चळवळीचे कार्य; हिंसाचार आणि लिंगभाव

- डॉ. चव्हाण मनिषा शिवाजी ---------- २५०

५८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातीव्यवस्थेबाबतचे निर्मूलन

- डॉ. काशिनाथ जगन्नाथ सोलनकर ---------- २५३

५९. डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची बहिष्कृत भारत आणि मूकनायक वृत्तपत्रे

- डॉ. काशिनाथ जगन्नाथ सोलनकर ---------- २५६

६०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीमुक्तीतील योगदान

- डॉ. काशिनाथ जगन्नाथ सोलनकर ---------- २६०

# स्वातंत्र्यपूर्व काळातील महाराष्ट्रातील स्त्रीविषयक दृष्टीकोन

१) डॉ. शितल चंद्रकांत पाटील
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय
आर्टस् कॉमर्स, रामानंदनगर (बुर्ली)
ता.पलूस जि. सांगली.
Mob.No. ९९४५७७९९००
shitalpatil01989@gmail.com

२) डॉ. सचिन श्रीरंग चव्हाण
नाईट कॉलेज ऑफ
इचलकरंजी

**प्रस्तावना :**

एकोणिसावे शतक हे महाराष्ट्राच्या इतिहासात महत्वाचे शतक ठरले. प्रस्तुत शतकातील महाराष्ट्रतील राजकीय, सामाजिक, आर्थिक स्थिती फार गुंतागुंतीची होती. तत्कालीन कालखंडात बरीच राजकीय स्थित्यंतर घडून आली होती परंतु सामाजिक जीवनात कोणताच बदल झाला नव्हता. स्त्रियांची स्थिती फार दयनीय होती. समाजामध्ये बालविवाह, सतीप्रथा, केशवपन इत्यादी अनिष्ट प्रथांचे प्रस्थ होते. धर्म, प्रथा, परंपरा यामध्ये स्त्रिया अडकलेल्या होत्या. शिक्षणापासून स्त्रिया वंचित होत्या. क्रीयाक्रम, क्रूर, पाशवी रूढी पद्धतीमध्ये बंदिस्त झालेल्या स्त्रीला बाहेर काढण्याची गरज निर्माण झाली होती. रूढी प्रथा परंपरेमध्ये अडकलेल्या स्त्रीला सक्षम करण्याची गरज होती. याचसाठी महाराष्ट्रात स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी विविध विचारवंतानी महत्वाचे योगदान दिले आहे. स्त्री सबलीकरणाच्या दृष्टीने, समाज सुधारणेच्या दृष्टीने विविध विचारवंतानी आपले योगदान दिले आहे.

आज स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीत गुणात्मकरित्या बदल झाला आहे. बऱ्याच स्त्रिया आपल्या पायावर उभ्या आहेत. विविध क्षेत्रात आपला यशस्वी ठसा उमटवत आहेत. आजच्या स्थितीला एकोणिसाव्या शतकात केलेले विविध सामाजिक, संस्थात्मक व संरचनात्मक पातळीवर केलेले प्रयत्न ही यामागची पार्श्वभूमी आहे. म्हणूनच तत्कालीन कालखंडात मांडलेल्या स्त्रीविषयक दृष्टीकोनाचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

**एकोणिसाव्या शतकातील प्रबोधन :**

एकोणिसाव्या शतकातील प्रबोधन हे उदारमतवादी तत्वज्ञानाशी निगडीत आहे. तत्कालीन कालखंडामध्ये पश्चिमात्य राष्ट्रामध्ये जो उदारमतवाद प्रचलित होता त्याचा प्रभाव महाराष्ट्रातील प्रबोधनावर झाला होता. महाराष्ट्रातील बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ हरी देशमुख, गोपाळ गणेश आगरकर, न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा ज्योतिबा फुले इत्यादींच्या कार्यावर उदारमतवादी तत्वज्ञानाचा प्रभाव पडला होता. प्रस्तुत तत्वज्ञानाच्या आधारे आपल्याला समाजामध्ये न्याय प्रस्थापित करता येईल हा विश्वास होता. या तत्वज्ञानाच्या आधारे दुबळ्या, वंचित स्त्री वर्गाला न्याय मिळावा यासाठी प्रयत्न केले. व्यक्तीव्यक्तीचा भेदभाव, जातीभेद, धर्मभेद, लिंगभेद मानणाऱ्या प्रवृत्तीविरोधात चालवली उभ्या केल्या, सामाजिक अन्यायाला विरोध, सामाजिक सुधारणेचा पुरस्कार केला, शिक्षणाला प्रोत्साहन दिले. या आधुनिक उदारमतवादी वैशिष्ट्यांच्या आधारे महाराष्ट्रामध्ये बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ हरी देशमुख , गोपाळ गणेश आगरकर, न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींनी स्त्रीविषयक दृष्टीकोन मांडला.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रीविषयक दृष्टीकोन :**

स्वातंत्र्यपूर्व काळातील महिलाविषयक दृष्टीकोन यासंदर्भात अभ्यास करत असताना बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ हरी देशमुख , गोपाळ गणेश आगरकर, न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा ज्योतिबा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी महाराष्ट्रातील विचारवंतानी स्त्री सुधारणेसाठी जे संस्थात्मक, संरचनात्मक पातळीवर जे प्रयत्न केले त्याचा अभ्यास केला आहे.

**बाळशास्त्री जांभेकर :**

बाळशास्त्री जांभेकर हे पाश्चिमात्य उदारमतवादी शिक्षणाचे पश्चिम भारतातील पहिले सुधारक आहेत. त्यांनी 'दर्पण' मधून विविध समाजउपयोगी विषयावर चर्चा घडवून आणली. स्त्री

ISSN No: 2394-5990

स्वातंत्र्य, स्त्री पुरुष समानता इत्यादींची माहिती अधिकाधिक व्यक्तीपर्यंत पोहचवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सती प्रथा, बाल हत्या, जरठ कुमारी विवाह इत्यादी दुष्ट प्रथा समाजामध्ये होत्या. जांभेकरांनी 'दर्पण' मध्ये १८३७ साली सातारा व जाफराबाद येथे दोन स्त्रिया सती गेल्याची नोंद केली आहे. १८३५ साली माळव्यातील बालहत्येचा प्रकारही त्यांनी नोंदवला आहे. स्त्रियांची यातून मुक्तता करायची असल्यास अज्ञान दूर करायचे असल्यास शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे त्यांचे मत होते. प्रस्तुत समाजदोषांचे निर्मुलन करण्यासाठी स्त्रीशिक्षण, बालविवाह निषेध, बालविवाह पुनर्विवाह इत्यादी तर्कशुद्ध विषयावर लिखाण करण्याचे व त्या दिशेने पद्धतशीर काम करण्याचे प्रथम प्रयत्न बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्रात केले.

'स्त्री' ही समाजाचा एक महत्वाचा घटक असतो. तिच्यावर केवळ कुटुंबाचेच नव्हे तर संपूर्ण समाजाचे हित अवलंबून असते. किंबहुना इस्त्रीफ हीच समाज घडवत असते याकरिता स्त्रिया सुशिक्षित झाल्या पाहिजे हा विचार महाराष्ट्रामध्ये रुजवला याचा पाया घालण्याचे कामबाळशास्त्री जांभेकर यांनी केले आहे. स्त्रीच्या अस्तित्वासाठी व तिच्या स्वातंत्र्यासाठी जांभेकरांनी 'दर्पण' मधून लिखाण केले.

'स्त्री' शिक्षणाचे बाळशास्त्री जांभेकर यांनी जोरदार समर्थन केले. स्त्री पुरुषांना समान हक्क तर हवेतच त्याबरोबर शिक्षण ही मिळाले पाहिजे असे विचार ज्या कालखंडात पुरुषांनाही शिक्षणाचा अधिकार नव्हता त्या कालखंडात त्यांनी प्रस्तुत विचार मांडले आहेत. स्त्रियांच्या मुलभूत हक्काचा, एक व्यक्ती म्हणून जगण्याचा, शिक्षणाचा विचार त्यांनी प्रथम मांडला. म्हणूनच स्त्री मुक्तीचा लढा जो कालांतराने पुढे येतो त्याची बीजे येथे जांभेकरांच्या विचारात सापडतात.

**गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी) :**

लोकहितवादी यांनी १८४८ ते १८५० या कालखंडात प्रभाकर मधून जी 'शतपत्रे' लिहिली त्यामधून त्यांनी स्त्रीसुधारणेचा पुरस्कार केला. बालविवाह, विधवा पुनर्विवाह, स्त्रियांची स्थिती, वाईट चालीरीती इत्यादी विषयावर त्यांनी जनजागृतीचे कार्य केले आहे. तत्कालीन कालखंडात स्त्रियांचा लवकर विवाह केला जायचा यामधून त्यांच्या आरोग्यविषयक समस्या निर्माण होत असत याकडे त्यांनी विज्ञानवादी दृष्टीकोनातून चिकित्सा केली आहे. लोकहितवादी यांनी स्त्रीशिक्षणासाठी जुन्या शास्त्रांना मागे टाकत नव्या विचारांची आखणी केली. स्त्रीयासंदर्भात प्रस्थापित रुढी या अशास्त्रीय असून त्यांचे उच्चाटन झाले पाहिजे असे आधुनिकतावादी विचार त्यांनी मांडले.

शिक्षणामुळे स्त्री वर्गात मोठा बदल घडून येईल त्यांना आपल्या दुस्थितीची जाणीव होईल. स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे तरच त्या प्रस्थापित व्यवस्थेविरोधात बंड करून उठतील. भविष्यातील पिढ्यांचे भविष्य हे स्त्रियांच्या हातात आहे. स्त्रिया ह्या जाचक रूढी प्रथा परंपरेमध्ये अडकलेल्या होत्या तरीही त्यांच्यावर समाजाचे दायित्व होते. म्हणूनच सामाजिक जबाबदारी पार पाडण्यासाठी शिक्षणाची गरज आहे. मुलांना घडविण्यामध्ये समाज घडविण्यामध्ये स्त्रियांचा वाट हा मोठा आहे त्याकरिता त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे. असे आधुनिकतावादी विचार त्यांनी मांडले.

**गोपाळ गणेश आगरकर :**

आगरकर 'स्त्री' स्वातंत्र्या संदर्भात दोन दृष्टीकोनातून पाहतात. त्यातील पहिला दृष्टीकोन म्हणजे स्त्रियांना स्वातंत्र्य मिळण्याबरोबर स्त्री ही 'स्त्री - पुरुष' संबाधामधील एक महत्वाची भागीदार आहे. म्हणून विवाह संस्थेच्या अंतर्गत आणि बाहेरही स्त्रीचा विचार करण्याची गरज आहे. तर दुसरा दृष्टीकोन असा की, स्त्री हा सार्वत्रिक घटक आहे, परंतु तो शोषक वर्ग आहे. हा वर्ग पुरुषसत्ताक व्यवस्थेला बळी पडलेला आहे. यामधून स्त्री ची मुक्तता व्हायला हवी असे आगरकरांचे मत होते.

आगरकर यांच्या 'स्त्री' स्वातंत्र्या संदर्भात विचारामध्ये 'स्त्री' ला मनुष्य म्हणून प्रतिष्ठा मिळाली पाहिजे हा मुख्य गाभा आहे. आजवर स्त्रियांच्या स्थितीचा विचार केला असता 'स्त्री' ला एक निर्जीव वस्तू आणि प्रजोत्पादनाच साधन म्हणूनच 'ती' कडे पाहिलं आहे. अनेक धर्मपरंपरेनी स्त्रीला मनुष्यत्वाचा दर्जाच नाकारलेला आहे. आजवर स्त्रियांना दुय्यम दर्जाच दिलेला आहे. ज्या प्रथा स्त्रियांना दुय्यम दर्जा देतात त्यावर आगरकर आपल्या लेखणीने कठोर टीका करतात. केशवपन, सतीचे वैध्यव्य यासारख्या अनिष्ट प्रथामधून स्त्रीचं जे वस्तुरूप समोर येत याविरोधात आगरकर आवाज उठवतात.

आगरकरांच्या एकूण सुधारणेच्या विचारात 'स्त्री' सुधारणेला महत्वाचे स्थान आहे. स्त्री स्वातंत्र्यासंदर्भातील विचार हे 'स्त्री हा समाजाचा महत्वाचा घटक' म्हणून त्याची चर्चा येते. ही चर्चा समता आणि विवेकदावर आधारित येते. प्रचलित समाजव्यवस्थेने व धर्मसंस्थेने स्त्रीला केवळ मादी स्वरूपात, वस्तुस्वरूपात आणले आहे. यामधून स्त्रीची सुटका होऊन मनुष्यत्व प्राप्त झाले पाहिजे. केवळ व्यक्ती म्हणून नव्हे तर सार्वजनिक जीवनात तिला निर्भयपणे सहभागी होता आले पाहिजे. यासाठी संधी व हक्क मिळाले पाहिजे. पुरुशासात्तक व्यवस्थेमध्ये पुरुषी वर्चस्वातून स्त्री मुक्त झाली पाहिजे. विवाहसंस्था व कुटुंबसंस्था यामधून होणारे स्त्रीचे शोषण थांबले

पाहिजे. शिक्षणाच्या हक्कामुळे स्त्री सुरक्षित व भयमुक्त वातावरणात पुरुषांच्या बरोबरीने अर्थोत्पादानाच्या प्रक्रियेत सहभागी होईल व यामुळे स्वातंत्र्य आणि सर्जनशीलतेला वाव मिळेल. असा अभिप्राय आगरकरांचा होता. स्त्रीला व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा लाभली पाहिजेत त्याशिवाय एक व्यक्ती म्हणूनतिला स्वातंत्र्यही प्रदान केल पाहिजे अशी आगरकरांची भूमिका होती.

**गोपाळ कृष्ण गोखले :**

गोखले यांनी स्थापन केलेल्या 'भारत सेवक समाज'च्या माध्यमातून स्त्री शिक्षणासंदर्भात महत्वाची भूमिका घेतली. भारत सेवक समाज या संस्थेमार्कत स्त्रियांना शिवणकाम, विणकाम, हस्तउद्योग, पाककला इत्यादी कौशल्या संदर्भात प्रशिक्षण दिले. शिक्षण हे व्यक्तिच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणू शकतेमुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे असे त्यांचे मत होते.

**महात्मा ज्योतिबा फुले :**

महाराष्ट्रातील स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले व त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी 'स्त्री' शिक्षणा संदर्भात केलेले कार्य हे महत्वाचे आहे. हा महिला सुधारणेसंदर्भातील महत्वाचा टप्पा होता. स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्मोधार शिक्षणामुळेच घडून येणार आहे, तुम्ही शिकलात तर पुष्कळ प्रगती साधाल असे महात्मा फुले स्त्रियांना सागतात. स्त्रीला पती, मुलबाळ या पलीकडे जग कळले पाहिजे याकरिता एकमेव मार्ग म्हणजे 'शिक्षण' होय. इ. स १८४८ मध्ये त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा स्थापन केली. विधवा विवाहास प्रोत्साहन व चालना दिली. परित्यक्ता स्त्रियांना आश्रय दिला आणि सर्वसामान्य स्त्रियांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच ज्योतिबा फुले यांना स्त्री मुक्ती चळवळीचे संस्थापक मानले जाते.

**राजर्षी शाहू महाराज :**

शाहू महाराजांनी महिला व मुलींच्या विकासासाठी शिक्षणासाठी आणि एकूणच सामाजिक परिवर्तन करण्यासाठी विशेष कार्य केले. त्यासाठी प्रत्यक्ष कृती करून स्वतःपासून सुरवात केली. वर्षानुवर्ष चालत आलेली आणि धर्ममान्य बनलेलेल्या प्रथा बंद केल्या. यासाठी १२ जुलै १९१९ रोजी विवाहासंबधीचा कायदा केला. या कायद्याने मुलींचे लग्नाचे वय १४ वर्ष व मुलांचे वय १८ वर्ष केले. समाजातील जातीभेद संपुष्टात आणण्यासाठी आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. १९१७ मध्ये विधवा विवाहाला प्रोत्साहन देणारा कायदा केला. ११ जुलै १९१९ रोजी काडीमोड कायदा केला. अनौरस संतती व जोगतीण याविषयी १७ जानेवारी १९२० रोजी कायदा केला. तत्कालीन समाज व्यवस्थेने वेगवेगळ्या कारणांनी काढून घेतलेली महिलांची प्रतिष्ठा परत देण्याचा हा अतिशय पुरोगामी प्रयत्न होता. शाहू महाराजांनी 'स्त्री' ला सबला बनवण्याचा प्रयत्न केला. स्त्रिया त्यांचे शिक्षण, विवाह, आरोग्य, पुनर्विवाह, घटस्फोट घेण्याचे स्वातंत्र्य, अनिष्ट प्रथापासून सुटका, स्त्री स्वावलंबन इत्यादी स्तरावर त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर :**

बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजतील सर्वच घटकांना 'शिका समाजातील सर्वच जाती धर्मांच्या महिलांकडे माणूस म्हणून पहिले. त्यांच्या सर्व प्रकारच्या हक्कांचा कायम आग्रह धरला. धर्माने नाकारलेले अधिकार महिलांना मिळावेत म्हणून त्यांनी 'हिंदू कोड बिल' यासारख्या कायद्याचा आग्रह धरला. महिलांच्या आरोग्याचा विचार करून त्यांनी कुटुंब नियोजनाचा आग्रह धरला. महिला कामगारांच्या प्रश्नाची सोडवणूक करत असताना स्त्री - पुरुष समान वेतन मिळवण्याचा कायदा केला. महिला प्रसूतीकाळात ठराविक विश्रांती आणि सेवा मिळावी यासाठी 'प्रसूती रजा' मंजूर करण्याचा कायदाकेला. स्त्रियांना पोटगी, दत्तक विधान, पालकत्व यांचे अधिकार हिंदू कोड बिलात तरतुदी केल्या आहेत. यामुळे स्त्रियांच्या हक्कांना कायद्याच संरक्षण मिळाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांकडे आर्थिक स्वायत्तता, क्षमता, परिपूर्णता असेल तर ती स्वावलंबी होऊ शकते. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढतो, आत्मबळ वृद्धिगत होते. त्यातून स्त्रिया स्वतःच्या विकासाबरोबर देशाच्या विकासामध्येही मोलाची भर घालतील या दूरदृष्टीने बाबासाहेबांनी स्त्रियांना अधिकार दिले.

**समारोप :**

स्त्री सुधारणेची प्रक्रिया ही विसाव्या शतकात गतिमान झाली असली तरी तीचा पाया हा एकोणिसाव्या शतकात घातला गेला. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात स्त्रियांना कोणतेही हक्क, अधिकार नव्हते. शिक्षण, अधिकार यापासून वंचित असणाऱ्या 'स्त्री' ला प्रवाहाबरोबर आणण्यासाठी विविध विचारवंताकडून प्रयत्न झाले. विविध अनिष्ट प्रथा चालीरीती यावर बंदी घालून स्त्रीला सक्षम करण्यासाठीचा प्रयत्न झाला. याला कायद्याचा आधार दिल्याने समाजात हे नवीन बदल रूढ होण्यास मदत झाली. परिवर्तनाच्या या बदलत्या प्रवाहामुळे

ISSN No. 2394-5990

स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या, नोकरी करू लागल्या एकंदरीत महिला सबल होऊ लागल्या.स्त्री सुधारणेस गतिमानता ही २० व्या शतकात जरी प्राप्त झाली असली तरी सुरवात ही एकोणिसाव्या शतकात झाली आहे हे नाकारता येणार नाही.

संदर्भ :

१. चौसाळकर अशोक – आधुनिक भारतीय राजकीय प्रवाह आणि अंत:प्रवाह, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०१४
२. फडके. य. दि – विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड एक (१९०१ – १९१४) सासवड आश्रम ट्रस्ट, पुणे
३. फडके. य. दि – शोध बालगोपाळांचा, विद्या प्रकाशन पुणे, १९७७
४. कड्डू , डॉ. मोहिनी – भारतीय राजकारणातील स्त्रिया, विजय प्रकाशन, नागपूर २००८
५. पवार दीपक – महिलांचे राजकीय सबलीकरण, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर २०१३
६. भोले भास्कर – विसावे शतक आणि भारतातील समता विचार, सुगावा प्रकाशन, पुणे २००४

■■■

Education through self help is our motto - Karmaveer



Rayat Shikshan Sanstha's

## Shri. Raosaheb Ramrao Patil Mahavidyalaya, Savlaj

Tal.- Tasgaon, Dist.- Sangli-416 311(Maharashtra) Affiliated to Shivaji University, Kolhapur

(Accredited 'B+' Grade with CGPA - 2.72 in the Third Cycle of NAAC)



Department of History & IQAC
in collaboration with
Shivaji University History Conference, Kolhapur

Indian Council of Social Science Research

organizes
ICSSR, New Delhi Sponsored
Two Days National Level Seminar
on

**'Subaltern Movements in India: Issues & Challenges'**

**18th & 19th January 2024**

# Certificate

This is to certify that Prof./Dr./Mr./Ms. प्रा. डॉ. शितल चंद्रकांत पाटिल of डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंद नगर has participated in the seminar as Key-note Speaker/ Resource Person/ Chairperson/ Participant. He/She has presented a research paper entitled स्वातंत्र्यपूर्व काळातील महाराष्ट्रातील स्त्रीविषयक दृष्टीकोन

| | | |
|---|---|---|
| **Dr. S. V. Panade** | **Dr. S. B. Babare** | **Prin. Dr. K. H. Shinde** |
| Coordinator IQAC | Oraganizing Secretary | Convener |